WORLD PEACE CENTRE (ALANDI)
Maharashtra Academy of Engineering and Educational Research's
MAHARASHTRA INSTITUTE OF TECHNOLOGY
Pune, India.

**कृपया प्रसिध्दीसाठी** दि. ०३ जानेवारी २०२५

# विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे, भारततर्फे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) ही अभिनव योजना जाहीर!

पुणे दि. ३ जानेवारी : भारताचे थोर सुपुत्र स्वामी विवेकानंद यांच्या 'विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून विश्ववशांती' या संकल्पनेवर आधारित मूल्याधिष्ठित वैश्विक शिक्षण पद्धतीचे अधिष्ठान घेऊन, आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेल्या **विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे, भारत** तर्फे खास १० वीच्या (एसएससी व सीबीएसई) हुशार व होतकरू विद्यार्थ्यांचे यशस्वी व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी तसेच त्यांनी भावी जीवनामध्ये विविध क्षेत्रांमध्ये पारंगत होऊन, आपले घराणे, समाज व राष्ट्र घडविण्यासाठी प्रेरित होऊन, वैश्विक स्तरावर मानवी कल्याणाचे उत्तुंग कार्य करावे, या सद्हेतूने **विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)** ही अभिनव योजना जाहीर करण्यात येत आहे.

या शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी ठरवण्यासाठी 'मूल्याधिष्ठित वैश्विक शिक्षण यशस्वी व्यक्तिमत्त्व विकास परीक्षा' दरवर्षी घेतली जाईल.




यंदाच्या वर्षी ही परीक्षा सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ रोजी घेतली जाईल. सदरील परीक्षा दोन भागामध्ये म्हणजेच पहिला पेपर सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुसरा पेपर दुपारी ३ ते ५ या दरम्यान होईल. या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर केला जाईल.

S. No. 124, Paud Road, Kothrud, Pune - 411 038 M. S. (INDIA)
Tel: +91-20-30273400/30273459 Fax: +91-20-25442770 E-mail: wpc@mitpune.com
www.mitpune.com

या ‘विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती परिक्षेचे’ स्वरूप खालीलप्रमाणे असेल.

१) सदरील परीक्षा इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या इयत्ता १० वीच्या मुलांसाठी घेतली जाईल.

२) परीक्षा दोन भागांमध्ये म्हणजेच, पहिला पेपर सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुसरा पेपर दुपारी ३ ते ५ या दरम्यान होईल.

३) महाराष्ट्रातल्या कोकण (मुंबईसह), उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र ह्या पाच विभागात एकाच दिवशी (दि. २७ जानेवारी रोजी) परीक्षा घेतली जाईल.

४) महाराष्ट्र राज्यातील वरील पाच विभागातील, प्रत्येक विभागातून गुणानुक्रमे पहिल्या नऊ (९) विद्यार्थ्यांना (त्या विभागातील जणू नवरत्नच) सदरची शिष्यवृत्ती / स्कॉलरशिप २ वर्षांसाठी (इयत्ता ११ व इयत्ता १२वी साठी) असेल:

पहिला क्रमांक – रु. २५,०००/– प्रतिवर्ष दुसरा क्रमांक – रु. २०,०००/– प्रतिवर्ष
तिसरा क्रमांक – रु. १५,०००/– प्रतिवर्ष चौथा क्रमांक – रु. १०,०००/– प्रतिवर्ष
पाचवा क्रमांक – रु. ७,०००/– प्रतिवर्ष

* उत्तेजनार्थ पुरस्कार *

सहावा क्रमांक – रु. ५,०००/– प्रतिवर्ष सातवा क्रमांक – रु. ३,०००/– प्रतिवर्ष
आठवा क्रमांक – रु. २,०००/– प्रतिवर्ष नववा क्रमांक – रु. १,५००/– प्रतिवर्ष

५) परिक्षेद्वारे शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना, शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी इयत्ता १० आणि इयत्ता ११ वी मध्ये किमान ७०% गुण मिळवणे आवश्यक आहे. अन्यथा शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

६) त्याचबरोबर, प्रत्येक विभागातील नऊ (९) यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि पदक देण्यात येईल. इतर सर्व उत्तीर्ण (किमान ५०% गुण मिळविणाऱ्या) विद्यार्थ्यांना ‘यशस्वी व्यक्तिमत्त्व विकास प्रमाणपत्र’ दिले जाईल.

७) सदरील विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती / स्कॉलरशिप परीक्षा ही आपापल्या मान्यताप्राप्त शाळेत घेतली जाईल. परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास मुख्याध्यापकांची शिफारस असणे आवश्यक आहे. सदरील परीक्षा घेणाऱ्या प्रत्येक शाळेतर्फे त्या केंद्रावर किमान ३० विद्यार्थी बसणे आवश्यक आहे.

८) सदरील परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला नोंदणी फी नाममात्र रु. १००/– इतकी असेल.

९) सदरील परीक्षेचे नियम / अटी इ. सर्व गोष्टींची माहिती https://wpcvalue-education.com या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ९४०३१३१२३१ उपलब्ध आहे.

विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती / स्कॉलरशिप योजना सुरु करण्यामागील संकल्पना, हेतू व भावना ही वैश्विक मूल्यांचा अंगिकार करून, विद्यार्थ्यांनी विश्वशांती आणि मानवकल्याणासाठी कार्य करावे आणि ‘वसुधैव कुटुंबकम्’ या मूळ भारतीय परंतु वैश्विक कल्याणासाठी असलेल्या संकल्पनेसाठी कार्यरत राहून, स्वामी विवेकानंदांनी उच्चारलेल्या विज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय साधण्याचे कार्य करावे, ही अपेक्षा !

सदरील माहिती, परीक्षेचे समन्वयक डॉ. एस. एन. पठाण (माजी कुलगुरु, नागपूर विद्यापीठ) आणि माईर संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड–चाटे यांनी दिली.

**जनसंपर्क विभाग**
विश्वशांती केंद्र (आळंदी)
माईर्स एमआयटी, पुणे, भारत